नि.फौ.ख.क्र.१६/२०२४
निशाणी क्र. २०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – राजेंद्र मनोहर कदम, वय – ५९ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – गढीताम्हाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. घटना आज पासून अंदाजे पाच ते सहा महिन्यापुर्वी घडली होती. घटना रात्री ११.३० च्या सुमारास घडली होती. घटना यशवंत विश्वास कदम यांच्या बागेत घडली होती. बागेमध्ये गवे, रेडे येतात त्याच्या राखणी करीता यशवंत विश्वास कदम जे की माझे चुलत भाऊ आहेत ते बागेत झोपण्यास गेले होते. त्यावेळेस मी गावामध्ये गेलो होतो. मी २५ तारखेला गावी परत आलो. त्यावेळेस मला भाऊ यशवंत याने असे सांगितले की, रात्री ११.०० वा. विकास कदम याचा फोन आला होता. विकास कदम याच्या भावाची बाग माझ्या भावाने तीन वर्षे कराराने घेतली आहे व त्याचे कुंपण करण्या करिता विकास कदम याने फोन केला होता. भावाने विकास कदम याला सांगितले की, तुझ्या भावाशी तू बोलून घे व फोन ठेवून दिला, रात्री ११.३० च्या सुमारास विकास कदम व आदित्य कदम आले व त्यांनी माझा भाऊ यशवंत कदम याला मारहाण केली, तसेच त्यांनी शिवीगाळी केली, पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर जीवे मारण्याची धमकी दिली असेही मला यशवंत याने सांगितले. यशवंत याच्या डाव्या पायावर मार लागला होता. त्याचा पाय फ्रॅक्चर झाला होता.

सरतपास पूर्ण.

**आरोपी क्र.१ व २ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ए.एम.माणगावकर यांचे मार्फत.**

०२. यशवंत हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर सामाईक असून एकच आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या जमिनीचे खाते देखील सामाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत याच्या वडिलांचे नाव विश्वास काशिराम कदम आहे. हे

म्हणणे खरे आहे की, आरोपी विकास याच्या वडिलांचे चंद्रकांत वसंत कदम आहे. चंद्रकांत वसंत कदम व विश्वास काशिराम कदम यांच्या दरम्यान जमिनीवरुन सुरु झालेला वाद ज्याचा रे.मु.नं.१६६/१९१९ सुरु होता, तो हल्लीपर्यंत सुरु होता अगर कसे हे मला माहीत नाही. ज्या जमिनीबाबत वाद होता त्याचे वाटप झाले अगर कसे हे मला माहीत नाही. मी करत असलेल्या शेती पैकी काही जमिनीचे सातबारे मी पाहिले आहेत. ते सातबारे कोणाच्या नावे आहेत हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, यशवंत हा माझा भाऊ असल्याने त्याने मला घटना घडली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, यशवंत कथन करतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस.पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि. ११/०८/२०२५